# आझादी-भारताच्या दडपशाहीपासून स्वातंत्र्य

*काश्मिरी मुस्लिमांनी २७ वर्षांची सैनिकी सत्ता आणि भारतीय सुरक्षा दलांकडून सर्व प्रकारचे अत्याचार सहन केले आहेत.*

काश्मीर खोऱ्यातल्या गोठवणाऱ्या थंडीची काहीच झळ उर्वरित भारतीय जनतेपर्यंत पोचत नाही. हिवाळ्यात एखाद्या घरात आसरा घेतलेल्या मोजक्या सशस्त्र बंडखोरांना मारण्यासाठी शेकडो भारतीय सैनिक येतात, स्थानिक जनता बंडखोरांना पाठिंबा देते व सैनिकांना कारवाई करण्यापासून रोखू पाहते आणि काही वेळा तर पळून जाण्यासाठी बंडखोरांना मदतही करते. सुरक्षा दलांच्या दृष्टीनं स्थानिक जनता ही साहजिकपणेच 'राष्ट्रद्रोही' असते आणि त्यामुळं तिथल्या नागरिकांशी कठोरपणे वागण्यात सैन्यदलांना काही गैर वाटतही नाही.

बंडखोरांना वाचवण्यासाठी स्थानिक जनतेतील अनेकजण आपला जीव पणाला लावायलाही तयार असतात, ही वस्तुस्थिती आहे. प्रत्येक बंडखोराच्या मृत्यूनंतर मोठ्या प्रमाणात रोष निर्माण होतो. हे सर्व बंडखोर भारतशासित पूर्व काश्मीरमधील असतात आणि काही बंडखोर पाकिस्तानशासित पश्चिम काश्मीरमधील असतात. एखाद्या बंडखोराला किंवा काही बंडखोरांना आणि विशेषतः नागरिकांना 'चकमकी'त मारण्यात आल्यावर मोठ्या प्रमाणात जनक्षोभ उसळतो. वातावरणातील कडक थंडीही या क्षुब्धतेला शांत करू शकत नाही. अशा निदर्शनांची तीव्रता वाढल्यावर सुरक्षा दलं गर्दीच्या दिशेनं गोळीबार करतात, आणि त्यातून निदर्शनांची आणखी एक लाट पुढे येते.

सैनिकी सत्तेसदृश परिस्थितीचा अनुभव काश्मिरी लोक गेली २७ वर्षं घेत आहेत. व्यावहारिकदृष्ट्या हा संपूर्ण प्रदेश 'अशांत' मानला गेला आहे, त्यामुळं नागरिकांना हानी पोचवल्यावरही सैन्य दलांना न्यायिक कारवाई होण्यापासून संरक्षण देण्यात आलेलं आहे. बलात्कार, अत्याचार, बेपत्ता लोक किंवा हत्या अशा सर्वच प्रकारांबाबत सैन्य दलांना संरक्षण मिळतं. 'असोसिएशन ऑफ पेरेन्ट्स ऑफ डिसअ‍ॅपिअर्ड पर्सन्स' (एपीडीपी) या संघटनेनं १० जानेवारी २०१७ रोजी प्रसिद्ध केलेल्या निवेदनानुसार, गेल्या वर्षी ८ जुलैपासून सुरू झालेल्या आंदोलनात शंभरहून अधिक नागरिकांना जीव गमवावा लागला आहे. सुरक्षा दलांनी वापरलेल्या छऱ्यांच्या बंदुकांमुळे एक हजाराहून अधिक नागरिकांना अंधत्व तरी आलं आहे किंवा त्यांच्या डोळ्यांना गंभीर इजा झाली आहे. 'सार्वजनिक सुरक्षा अधिनियम, १९७८' या कठोर कायदेशीर मार्गाचा वापर करून अनेकांना अटक करण्यात आली. विविध गुन्ह्यांखाली अटक करण्यात आलेल्यांची संख्या सुमारे आठ हजार असल्याचं अधिकृत सरकारी आकडेवारी सांगते. दीर्घकाळ चालणारी संचारबंदी, माध्यमं व आंतरजालावर बंदी, अभिव्यक्ती स्वातंत्र्य व शांततापूर्ण सभा घेणं या मूलभूत अधिकारांवर आलेली गदा, अशी परिस्थिती इथं आढळते.

बेपत्ता झालेल्या व्यक्तींच्या पालकांची व इतर निकटवर्तीयांची वेदना अतिशय तीव्र स्वरूपाची आहे. १९८९ पासून आठ हजार ते दहा हजार काश्मिरींना सक्तीनं बेपत्ता करण्यात आलं आणि नंतर बनावट चकमकींमध्ये त्यांची हत्या करण्यात आली, असा अंदाज एपीडीपी संघटनेनं वर्तवला आहे. ओमर अब्दुल्ला यांच्या नेतृत्वाखालील गतकालीन जम्मू-काश्मीर सरकारनं या संदर्भात ३,७४४ हा आकडा राज्याच्या विधानसभेत मान्य केला होता. परंतु बेपत्ता व्यक्ती व

बनावट चकमकींच्या बाबतीत भारतीय राज्यसंस्था आणि प्रशासकीय यंत्रणा जबाबदारी झटकतच आली आहे. हिंसापीडित लोकांवरच हिंसेचा दोष टाकण्याची राज्यसंस्थेची भूमिका राहिली आहे. जम्मू-काश्मीरमधील या सक्तीच्या बेपत्ताकरणाविरोधात दर महिन्याच्या दहा तारखेला एपीडीपी संघटनेतर्फे मूक ठिय्या आंदोलन केलं जातं, शिवाय ही संघटना एक स्मरण दिनदर्शिकाही प्रसिद्ध करते. 'बेपत्ता झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांच्या यातना विस्मृतीत जाऊ नयेत याची जबाबदारी' या संघटनेनं घेतली आहे. सक्तीच्या बेपत्ताकरणापासून संरक्षण देणारा कायदा राज्याच्या विधानसभेनं अजूनही मंजूर केलेला नाही, यावरून आत्तापर्यंतच्या राज्य सरकारांची या प्रश्नाबाबतची उदासीनता दिसून येते. शिवाय 'सक्तीच्या बेपत्ताकरणापासून सर्व व्यक्तींना संरक्षण देण्यासाठीच्या आंतरराष्ट्रीय नियमावली'चा कायदेशीर स्वीकार न करणारी केंद्रातील सर्व सरकारंही असंवेदनशील राहिली आहेत.

मुळात गेली २७ वर्षं काश्मीर खोऱ्यातील जनतेविरोधात भारत सैनिकी बळाचा वापर करतो आहे. या जनतेमधील अनेकांना भारतामध्ये राहण्याची इच्छा नाही. नवी दिल्लीकडून या सर्व प्रकारांचं समर्थन 'भौगोलिक एकता' व 'धर्मनिरपेक्षता' या नावांखाली केलं जातं. काश्मीर खोऱ्यातील घडामोडींसाठी भारत पाकिस्तानला दोष देतो. सर्व जनआंदोलनं व बंडखोरी 'पाकिस्तानपुरस्कृत' असल्याचं सांगितलं जातं. परंतु विद्यमान केंद्र सरकारचा राष्ट्रवादही अखिल भारतीय स्वरूपाचा नाही. भारतीय लोकसंख्येतील केवळ एका घटकाचं प्रतिनिधित्व करणारा हा सांप्रदायिक हिंदुत्ववादी राष्ट्रवाद आहे. सरकारमधील हिंदुत्ववादी राष्ट्रवाद्यांना धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली काश्मिरी मुस्लिमांवर आपली सत्ता लादण्यात काहीच गैर वाटत नाही. या संदर्भात काँग्रेसचा राष्ट्रवाद मागे राहात नाही, हे वेगळं नोंदवायलाही नको. शिवाय, पाकिस्तानी राष्ट्रवादाची यातली भूमिका याच धर्तीची आहे. आता हिंदुत्ववादी राष्ट्रवाद्यांनी पाकिस्तानातील बलोच राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीला पाठिंबा दिला आहे. यात बलोच स्वातंत्र्यवाद्यांच्या ध्येयाबद्दलची खरीखुरी आस्था नाही, हे उघडच आहे. तिकडे, पाकिस्तानी राष्ट्रवाद्यांनी भारतापासून स्वतंत्र होण्यासाठीच्या काश्मिरी 'आझादी'च्या मुद्द्याला पाठिंबा असल्याचं म्हटलं आहे. वास्तविक, 'आझाद काश्मीर'ला पाकिस्ताननं एखाद्या वसाहतीचं स्वरूप दिलं आहे. परंतु गेली २७ वर्षं काश्मीर खोऱ्यात भारत वापरत असलेल्या सैनिकी बळाच्या पार्श्वभूमीवर इतर अनेक गोष्टींसोबतच काश्मिरी आझादीचा नारा म्हणजे तिथल्या जनतेचा टाहोच आहे, हे मान्य करावं लागतं. भारतीय दडपशाहीपासून स्वातंत्र्य मिळवण्यासाठीचा हा नारा आहे.

०००

# भ्रष्टांना आळा बसेल का?

*बेहिशेबी संपत्तीच्या खटल्यातील निकालानं भ्रष्ट राजकारण्यांना आळा बसेल का?*

व्ही. के. शशिकला या तामिळनाडूच्या मुख्यमंत्री बनताबनता राहिल्या आणि आता त्या तुरुंगात आहेत. अखिल भारतीय अण्णा द्रमुक पक्षाच्या नेत्या जे. जयललिता यांचं ५ डिसेंबर २०१६ रोजी चेन्नईत निधन झालं. त्यानंतर प्रसारमाध्यमं व तामिळी जनता यांचं लक्ष जयललितांच्या पट्टशिष्या शशिकला यांच्या भवितव्यावर केंद्रीत झालं. यासंबंधीचे सर्व तर्कवितर्क १४ फेब्रुवारीला अवाजवी संपत्तीसंबंधीच्या निकालानं संपुष्टात आले. दोन दशकं चाललेल्या या खटल्यामध्ये 'भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८'नुसार जयललिता, शशिकला आणि व्ही. एन. सुधाकरन व जे. इलावरसी हे शशिकलांचे दोन नातेवाईक दोषी आढळले. दरम्यान, तामिळनाडूतील राज्य सरकारवर नेतृत्वाचा दावा सांगताना शशिकला यांनी त्यांच्या निष्ठावान आमदारांना एका रिसॉर्टमध्ये नेऊन ठेवलं होतं, या राजकीय नाट्यामध्ये प्रसारमाध्यमं इतकी गुंतली की अवाजवी संपत्तीचा खटला झाकोळला गेला. सर्वोच्च न्यायालयाच्या निकाल जाहीर करण्याच्या वेळेबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले असले तरी त्याच्या अलाहिदा, हा निकाल महत्त्वाचा आहेच.

उत्पन्नाच्या ज्ञात स्त्रोतांपेक्षा अवाजवी संपत्ती

बाळगल्याप्रकरणी जयललिता यांना सप्टेंबर २०१४ मध्ये विशेष सुनावणी न्यायालयानं दोषी ठरवलं होतं. ही बेहिशेबी मालमत्ता लपवण्यात सहभाग घेतल्याबद्दल शशिकला व इतर दोन आरोपींनाही दोषी ठरवण्यात आलं. कर्नाटक उच्च न्यायालयानं ११ मे २०१५ रोजी विशेष न्यायालयाच्या निकालाविरोधात निवाडा दिला. कर्नाटक उच्च न्यायालयाच्या या निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलं होतं. त्यानंतर १४ फेब्रुवारी रोजी सर्वोच्च न्यायाल्यानं या खटल्यातील आधीचा- म्हणजे विशेष सुनावणी न्यायालयाचा निकालच योग्य असल्याचा निर्वाळा दिला. या खटल्यातील प्रथम आरोपी जयललिता यांचं निधन झालं असलं, तरी इतर- शशिकला यांच्यासह-तीन आरोपींना चार वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागेल आणि सुनावणी न्यायालयानं सांगितल्यानुसार प्रत्येकी दहा कोटी रुपयांचा दंडही भरावा लागेल, असं सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट केलं आहे.

न्यायमूर्ती पिनाकी चंद्र घोष व अमितव रॉय यांच्या तब्बल ५७० पानांच्या निकालपत्रामध्ये अवाजवी संपत्ती कशी लपवावी याचा प्राथमिक धडाच वाचायला मिळतो. आपली बेहिशेबी मालमत्ता लपवण्यासाठी जयललितांनी शशिकला व त्यांच्या नातेवाईकांचा वापर केला, असा निष्कर्ष विशेष सुनावणी न्यायालयाचे न्यायाधीश जॉन मायकल डिकुन्हा यांनी काढला होता, त्यासंबंधीचा पुरावाही अंतिम निकालपत्रात वाचायला मिळतो. या लपवाछपवीसाठी वापरण्यात आलेली पद्धती नवीन वा कल्पक नव्हती. भारतामध्ये उत्पन्नाचे बेकायदेशीर स्रोत लपवणाऱ्या सार्वजनिक व खाजगी जीवनातील लोकांकडून हीच पद्धत सर्रास वापरली जाते. जयललितांच्या प्रकरणात एकाच पत्त्यावर ३४ बनावट कंपन्यांची नोंदणी करण्यात आली. यातील दहा कंपन्यांची नोंदणी एकाच दिवशी झाली, तर सहा कंपन्यांची नोंदणी दुसऱ्या दिवशी करण्यात आली. या कंपन्यांसाठी ५० बँक खाती उघडण्यात आली, त्यातील ४७ खाती एकाच बँकेत होती. यातील बहुतांश कंपन्यांचं एकमेव काम अवमूल्यन झालेली मालमत्ता विकत घेणं एवढंच होतं. एका खात्यावरून दुसऱ्या खात्यावर पैसा फिरवला जात होता, बँकांकडून कर्ज घेतली जात होती आणि कर्जाची पूर्ण रक्कम हातात आलेली नसतानाही देणी सदराखाली त्यांची नोंद होत होती. या कृतींमधील निर्ढावलेपणा पाहता हे स्पष्ट होतं की, गुन्हेगारांना आपण पकडले जाणार नाही याची पूर्ण खात्री होती.

बंडखोर राजकारणी सुब्रमण्यम स्वामी यांनी जून १९९६मध्ये दाखल केलेल्या याचिकेवरून सुरू झालेला हा खटला दीर्घ काळ लांबला असला तरी सुनावणी न्यायालय व सर्वोच्च न्यायालय अशा दोन्ही पातळ्यांवर या कृतींना गुन्हा मानलं जाणं हा एक महत्त्वाचा पायंडा आहे. कर्नाटक उच्च न्यायालयाचे न्यायाधीश सी. आर. कुमारस्वामी यांनी दिलेला निकाल सर्वोच्च न्यायालयानं रद्द केला आहे. उच्च न्यायालयाच्या या निकालामध्ये जयललिता व इतर आरोपींना दोषमुक्त करण्यात आलं होतं. 'उपलब्ध पुराव्याचं चुकीचं वाचन' आणि आरोपींचं उत्पन्न, संपत्ती व देणी यांच्याबाबतची 'चुकीची गणिती आकडेवारी' कर्नाटक उच्च न्यायालयाच्या निकालात दिसत असल्याचं निरीक्षण सर्वोच्च न्यायालयानं नोंदवलं. या पार्श्वभूमीवर कनिष्ठ न्यायालयातील निकालाच्या विश्वासार्हतेवर सर्वोच्च न्यायालयानं शिक्कामोर्तब करण्याच्या कृतीचं वेगळेपण ठळकपणे जाणवतं.

एक जुलै १९९१ ते ३० एप्रिल १९९६ या काळातील जयललितांची संपत्ती व उत्पन्नाचे स्रोत यांची तपासणी करताना विशेष सुनावणी न्यायालयानं प्रत्येक सूक्ष्म तपशिलाचा विचार केला. जयललितांची संपत्ती १९९१ साली २.०१ कोटी रुपये इतकी होती आणि १९९६ साली ती ६४.४४ कोटी रुपये इतकी झाली, यातून त्यांच्या संपत्तीमधील अवाजवी वाढ दिसते, असं त्या न्यायालयानं सिद्ध केलं होतं. सुनावणी न्यायालयाचा निकाल 'काटेकोर, संवेदनशील, जागरूक व समंजस' असल्याचं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. 'पब्लिक सर्व्हन्ट' (लोकसेवक) असं रोचक वर्णन केले जाणारे शक्तिशाली लोक कायद्याचा भंग करत असतील तर त्यावर चाप लावण्यासाठी न्यायव्यवस्था काय करू शकते याचं अपवादात्मक व स्वागतार्ह प्रात्यक्षिक विशेष सुनावणी न्यायालयानं दाखवलं. न्यायाधीश डिकुन्हा यांनी आपल्या तपासकामामध्ये संबंधित शक्तिशाली राजकीय व्यक्तींचा दबाव येऊ दिला नाही. प्रत्येक आरोप व त्यासंबंधीच्या बचावाचा सखोल आढावा घेणारं त्यांचं तपशीलवार निकालपत्र अभ्यासाचा विषय ठरण्याजोगं

आहे. तामिळनाडूहून हा खटला कर्नाटकला हलवण्यात आला, हेही न्यायदानाच्या प्रक्रियेसाठी उपयोगी ठरलं. लोकसेवकांना देण्यात येणाऱ्या 'भेटवस्तू' या उत्पन्नाचा कायदेशीर स्रोत मानता कामा नयेत (जयललितांनी असा प्रयत्न केला होता), कारण यात अप्रत्यक्ष स्वरूपात लाचखोरी होऊ शकते, हा महत्त्वाचा मुद्दाही या निकालात स्पष्ट करण्यात आला. नकद रक्कम किंवा इतर स्वरूपात मिळणाऱ्या अशा भेटींचा तपशील जाहीर करणं, एवढी कृती 'या भेटींना कायदेशीर उत्पन्न बनवायला पुरेशी नाही'.

'भेटीं'च्या बदल्यात काही लाभ करून देणं, हा व्यवहार या देशातील हजारो 'लोकसेवकां'साठी नियमित कामाचा भाग बनला आहे, आणि बेहिशेबी मालमत्ता लपवण्यासाठी करप्रशासनाच्या तपासणीपासून कसा पळ काढायचा याचे कल्पक मार्ग त्यांनी पूर्वीच शोधून काढलेले आहेत. त्यामुळे या निकालानं अशा व्यवहारांवर काही चाप बसेल का हे येणारा काळच ठरवेल. परंतु या निकालातून एवढं तरी नक्की स्पष्ट झालं आहे की, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम व अशा इतर कायद्यांमधील कठोर तरतुदींचा सक्षम वापर नागरिकांनी भ्रष्ट व्यक्तींविरोधात केला तर त्याचे परिणाम दिसू शकतात. पण दुर्दैवानं, भ्रष्टाचारविरोधी कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्नशील असलेल्या लोकांच्या निर्धाराचं खच्चीकरण न्यायव्यवस्थेच्या वेळखाऊ प्रक्रियेमुळे होतं. बेहिशेबी संपत्तीच्या या खटल्यातील अंतिम निकालासाठी दोन दशकं लागली यावरून ही बाब पुन्हा अधोरेखित झाली.

०००

## करो या मरो!

*उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीचा निकाल भारतीय राजकारणाची रूपरेषा घडवणारा असेल.*

उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीच्या निकालाचा महत्त्वाचा परिणाम भारतीय राजकारणाच्या नजीकच्या भविष्यावर होईल, हे उघड आहे. देशातील एकशष्ठमांश नागरिक या राज्यात राहातात. उत्तर प्रदेश हे वेगळं राष्ट्र असतं तर जगातील पाचवं सर्वाधिक लोकसंख्येचं राष्ट्र म्हणून त्याची गणना झाली असती. या महाकाय निकषांपेक्षाही व्यापक महत्त्व उत्तर प्रदेशातील विधानसभा निवडणुकांना असतं, हे इतिहासात अनेक प्रसंगांवेळी सिद्ध झालं आहे. सध्याच्या निवडणुकांचा संदर्भ आणि वेळ पाहाता हाही असाच ऐतिहासिक प्रसंग आहे, असं म्हणावं लागेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ नोव्हेंबर २०१६ रोजी निश्चलनीकरणाद्वारे ८६ टक्के चलनी नोटा व्यवहारातून बाद करण्याचा नाट्यमय निर्णय घेतला. या धक्कादायक निर्णयाच्या अंमलबजावणीनंतर पहिल्यांदाच पाच राज्यांमध्ये विधानसभेच्या निवडणुका होत आहेत. या पाच राज्यांमधील उत्तर प्रदेश हे सर्वांत मोठं राज्य आहे, त्यामुळं इथल्या निकालाकडे निश्चलनीकरणावरील सार्वमत असल्याप्रमाणे पाहिलं जाईल. भारतीय जनता पक्ष (भाजप) उत्तर प्रदेशात जिंकला किंवा किमान सर्वांत मोठा पक्ष म्हणून समोर आला, तर या निकालाला मोदींच्या नेतृत्वावरील शिक्कामोर्तब मानलं जाईल. शिवाय लोकांवर मोहिनी घालण्यासोबतच धारदार राजकीय मर्मदृष्टीही त्यांच्याकडे आहे, असा निष्कर्ष या निकालातून निःसंशयपणे काढला जाईल. मोदींचे सर्वाधिक निकटचे सहकारी पक्षाध्यक्ष अमित शहा यांनाही या निकालाचा लाभ होईल. अशा प्रकारे निकाल लागला तर पंतप्रधान मोदी विरोधकांच्या बाबतीत आणखी आक्रमक भूमिका घेतील आणि आधीच असहाय अवस्थेत असलेल्या विरोधकांची परिस्थिती आणखी बिकट होईल.

उत्तर प्रदेशातील निवडणुकीत भाजपचं संख्याबळ दुसऱ्या किंवा तिसऱ्या क्रमाकाचं राहिलं, तर मात्र मोदी व शाह यांच्या स्थानाला जबर धक्का बसेल. २०१४ सालच्या लोकसभा निवडणुकीमध्ये राज्यातील ४०३ विधानसभा विभागांपैकी ३२८ विभागांमध्ये भाजपनं आघाडी घेतली होती, त्यामुळं आता विधानसभा निवडणुकांमध्ये अपयश आल्यास पक्षासाठी हा एक नाट्यमय धक्का असेल. त्यानंतर मोदींचे पक्षांतर्गत विरोधकही निराशेतून बाहेर येतील. निश्चलनीकरणाच्या निर्णयासारखा राजकीय जुगार खेळणाऱ्या व्यक्तीच्या हातात भाजपचं भवितव्य सुरक्षित

आहे का, असा प्रश्न उपस्थित करण्याएवढं धाडस या विरोधकांमध्ये निर्माण होईल. मोदींच्या वतीनं सूत्रं हलवणाऱ्या शाह यांना याची सर्वाधिक झळ सहन करावी लागण्याची शक्यता आहे. पण उत्तर प्रदेशात भाजपचा पराभव झाला तर त्याचे पडसाद भाजपच्या पलीकडेही उमटतील. समाजवादी पक्ष–काँग्रेस आघाडी किंवा बहुजन समाज पक्ष (बसप) या दोन मोठ्या प्रतिस्पर्ध्यांपैकी ज्याचा विजय होईल त्याला उत्तर प्रदेशातील राजकारणात बळकटी प्राप्त होईलच, शिवाय या विजयाचा वापर करून राष्ट्रीय राजकारणातील आकांक्षा वाढवण्याचे या पक्षांचे प्रयत्नही सुरू होतील. ऑक्टोबर २०१५ मधील बिहार विधानसभा निवडणुकीनंतरही अशी परिस्थिती दिसून आली होती. मोदींच्या नेतृत्वाखालील भाजपचा पराभव करण्यासाठी २०१९ साली विरोधकांच्या संयुक्त आघाडीचं संभाव्य नेतृत्व म्हणून बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या नावाची चर्चा त्या वेळी सुरू झाली. आता उत्तर प्रदेशातील निवडणुकीत भाजपचा पराभव झाल्यास अखिलेश यादव किंवा मायावती यांना राष्ट्रीय पातळीवरील संभाव्य विरोधी नेतृत्वाच्या भूमिकेत पाहिलं जाईल.

भाजपला व्यवहार्य पर्याय उभा करण्यासाठी बिहारप्रमाणे 'महाआघाडी' घडवणं हा एकमेव मार्ग उपलब्ध आहे, या गृहीतकावर प्रश्नचिन्ह उमटण्याची शक्यता या निवडणुकीत आहे. समाजवादी पक्षानं या निवडणुकीत काँग्रेससोबत तुलनेनं मर्यादित स्वरूपाची आघाडी केलेली आहे, आणि काँग्रेसला उत्तर प्रदेशाच्या राजकारणात दुय्यम सहाय्यकापेक्षा मोठी भूमिका निभावणं शक्यच नाही. या पार्श्वभूमीवर समाजवादी पक्षाला विजय मिळाला किंवा सर्वांत मोठ्या पक्षाचं स्थान मिळालं तर 'महाआघाडी'संबंधीच्या गृहीतकाला छेद जाईल. याचबरोबर अखिलेश यादव हे एक तल्लख मुत्सद्दी नेते आहेत, हेही सिद्ध होईल. कौटुंबिक राजकारणाच्या अस्थिरतेला तोंड देत मोठ्या प्रमाणात मतदारवर्गही स्वतः च्या पाठीशी उभं केल्याचं श्रेय त्यांना मिळेल. शिवाय अखिलेश यांचं तरुण वय पाहता ते 'लंबी रेस का घोडा' मानले जातील. एका टप्प्यावर समाजवादी पक्षाच्या अस्तित्वालाच धोका निर्माण करणाऱ्या गटबाजीच्या राजकारणावर मात करण्याची आपली नेतृत्वक्षमता अखिलेश यांनी स्पष्टपणे दाखवून दिली आहे.

भारताच्या बहुपक्षीय लोकशाहीचं 'वैयक्तिकीकरण' होण्याचा टप्पा एप्रिल–मे २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत दिसून आला. या टप्प्यात पक्षांपेक्षा पक्षाचं प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तींना महत्त्व देण्यात आलं. ही निवडणूक जवळपास अमेरिकी राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीसारखी झाली, त्यात मोदी व राहुल गांधी यांच्यातील स्पर्धेत मोदींचा निर्विवाद विजय झाला. पण ही दुहेरी तलवारीसारखी परिस्थिती होती. फेब्रुवारी २०१५मध्ये दिल्लीत आम आदमी पक्षाचे अरविंद केजरीवाल व भाजपच्या किरण बेदी यांच्यातील लढाईत केजरीवाल यांनी मैदान मारलं. ऑक्टोबर २०१५मध्ये बिहार विधानसभा निवडणुकीत नितीशकुमार यांनीही असंच यश मिळवलं. या पार्श्वभूमीवर, आताच्या उत्तर प्रदेशातील निवडणुकांवेळी अखिलेश व मायावती यांच्याविरोधात भाजपकडे मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार नाही, ही बाब लक्षणीय आहे. बसपची कामगिरी चांगली झाली तर त्याचं श्रेय मायावतींना असेल. अखिलेश यांनी पाच वर्षांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळानंतरही प्रस्थापितविरोधी जनभावनेवर मात केली तर त्यांनाही त्याचं वैयक्तिक श्रेय मिळेल. शिवाय, एकगठ्ठा मतांचं किंवा अस्मितेचं राजकारण आता कितपत प्रभावी आहे, आणि मुस्लीम, दलित व इतर मागास वर्गीय त्यांचा मताधिकार अपेक्षेप्रमाणे राबवत आहेत का, या गोष्टीही उत्तर प्रदेशातील निकालांवरून स्पष्ट होतील.

पुढील (२०१९च्या) लोकसभा निवडणुकीला दोन वर्षं उरली आहेत. उत्तर प्रदेशात भाजपचा पराभव झाल्यास या दोन वर्षांमध्ये मोदी किंवा शाह यांच्या कार्यपद्धतीत कोणते बदल होतील? आपण आश्चर्याचे धक्के देऊ शकतो हे मोदींनी आधीच आपल्याला दाखवलं आहे, त्यामुळं त्यांच्या कृतींसंबंधी काही पूर्वअंदाज बांधणं धोकादायक ठरेल. पक्षांतर्गत विरोधक व विरोधी पक्ष यांच्याबाबत ते अधिक नरमाईची भूमिका घेतील का? की, आधीप्रमाणेच आक्रमकता कायम ठेवून ते अधिक धृवीकरणाचं राजकारण करत राहतील? या प्रश्नांची उत्तरं काहीही असली तरी ११ मार्चला उत्तर प्रदेशातील निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर भारतीय राजकारणाचा मार्ग बदलेल, हे निश्चित.

०००